# प्र क र ण सा त वे

## निष्कर्ष आणि तुलना

# प्रकरण सातवे

## निष्कर्ष आणि सूचना

निष्कर्ष :-

मागील सहा प्रकरणात केलेल्या अभ्यासाच्या आधारे विश्लेषणातून निर्माण झालेले निष्कर्ष एकत्रित स्वरुपात खाली दिले आहेत.

[१] कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर ची स्थापना [१९४७] होऊन आज ४२ वर्षे झाली आहेत. ज्वारी, शेंग या शेतमालाची तसेच बैल, शेळ्या-मेंढया या जनावरांची आवक या बाजारपेठेत जास्त प्रमाणात आहे. या बाजारपेठेची वार्षिक उलाढाल चार कोटी रुपयेची आहे असे आढळून आले.

[२] मंगळवेढा उपबाजारामध्ये फक्त शेळ्या-मेंढयांचा बाजार चालतो तर करकंब व माळशिरस उपबाजार बंद आहेत.

[३] सर्वेक्षणात समाविष्ट झालेल्या शेतक-यांचे वय सामान्यपणे ४५ पर्यंत आहे. बहुसंख्य शेतकरी हिंदू-मराठा जातीतील असून त्यांचे शिक्षण प्राथमिक पर्यंत झालेले दिसते. त्यांचा प्रमुख व्यवसाय शेती हाच आहे. शेतकरी म्हणून त्यांचा अनुभव काळ सामान्यपणे जास्त [२० वर्षापेक्षा जास्त] आहे. बहुतांश शेतकरी कुटुंबामध्ये ४ ते ६ व्यक्ती आहेत. तीन पर्यंत पुरुष व स्त्रिया असणा-या कुटुंबाची संख्या जास्त आढळली.

[४] १९७७-७८ च्या तुलनेत १९८७-८८ मध्ये शेतक-यांची उत्पन्न पातळी वाढलेली दिसते. त्यांची आर्थिक स्थिती सुधारलेली दिसते.

[५] विविध धारण क्षेत्रात कोरडवाहू शेती करणारे ५९ टक्के शेतकरी आहेत. तर साडेआठ हेक्टर मर्यादे पर्यंत धारण क्षेत्र असणारे शेतकरी ७६ टक्के आहेत. जवळ-जवळ निम्म्या शेतक-यांची काही जमीन पडीत आहे. शेतक-यांची

UNIVERSITY KOLHAPUR

विभागणी केली असता असे दिसते की ३७ टक्के सीमांत शेतकरी, २५ टक्के लहान शेतकरी, १५ टक्के मध्यम शेतकरी तर २२.५० टक्के मोठे शेतकरी आढळले.

[६] शेतक-यांचे पीक प्रकारानुसार वर्गीकरण केले असता असे आढळले की, पक्के पिकविणा-या तीन शेतक-यामागे सात व्यक्ती भाजीपाला, २१ व्यक्ती नगदी पीके, २६ व्यक्ती अन्नधान्य पिकवितांना आढळतात.

सर्वेक्षण गावातील पीक पध्दतीत फार मोठा बदल झाला आहे. सामान्यपणे धान्यांकडून व्यापारी पीके घेण्याकडे शेतक-यांचा कल बदललेला दिसतो. देशी अन्नधान्य व कडधान्ये घेणा-यांची संख्या दखलात घटली असून गळीताची धान्ये व व्यापारी पीके घेणा-यांची संख्या वाढलेली दिसते. तसेच संकरीत पध्दतीत सर्व गटात वाढ दिसून येते.

शेती पध्दतीत खरा बदल साखर कारखान्यामुळे झाला आहे. त्यामानाने कृषि उत्पन्न बाजार समितीची पीक पध्दतीवरील परीणाम अल्प आहे. शेतीच्या व्यापारी-करणात व बारमाही-करणातील असावा वाटा उणे केल्यास राहणारा परिणाम व्यापारीकरणात थोडा बरा असला तरी बारमाहीकरणात फारसा दिसत नाही हा खरा पंढरपूरच्या बाजार समितीच्या कार्याचा पीक पध्दतीवर झालेला परिणाम होय.

[७] जमीन खरेदीसाठी शेतकरी नातेवाईक, व्यापारी बँक यांच्या सहाय्याने सापेक्षत: जास्त खरेदी किंमत देतो तर कौटुंबिक खर्च, देणी देण्यासाठी सापेक्षत: शेतकरी कमी किंमतीला आपली जमीन विकतो.

[८] कर्ज घेणा-या शेतक-यांचे प्रमाण ६५ टक्के इतके जास्त आहे. शेतकरी सहकारी संस्था, कमिशन एजंट, व्यापारी बँका व खाजगी सावकार

अशा उतरत्या क्रमाने कर्ज देण्यासाठी प्राधान्य देतो.

[९] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारामध्ये २८ कृषि वस्तू व सात प्रकारच्या जनावरांच्या व्यवहारावर नियंत्रण केले जाते. याबरोबर केळी, डाळिंब व द्राक्षे या फळांना नियंत्रणाखाली आणण्याचा प्रयत्न सुरू आहे.

[१०] महाराष्ट्र कायदा १९६३ व उपनियम १९६८ अन्वये तसेच बाजार समितीच्या नियमानुसार बाजार समितीची रचना ठरविली आहे. त्यानुसार पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती कार्य करते. यामध्ये शेतकरी सदस्यांची संख्या जास्त आहे. असे असले तरी "शेतकरी समाज" म्हणावा तसा बाजार आवारामध्ये शेतमालाची आवक वाढविण्याचा प्रयत्न करीत नाही. कारण बहुतांश मोठे शेतकरीच समितीचे सभापती व उपसभापती झालेले दिसतात. बाजार व्यवस्थापनेसाठी पंढरपूर बाजार समितीमध्ये २१ प्रशासकीय सेवक कार्य करीत आहेत.

[११] आतापर्यंत पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या सर्वसाधारण सभेची संख्या ३३४ झाली आहे. उपसमित्यांच्याही सभा वेळोवेळी होतात. सभेत सदस्यांची उपस्थिती समाधानकारक असते.

[१२] इंडियन स्टॅन्डर्ड इन्स्टीट्यूटने निर्देषित केलेली बाजार रचना व सोई-सुविधा नियंत्रित बाजारपेठांवर बंधनकारक नाहीत. त्याला पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठही अपवाद नाही. पंढरपूर बाजार आवारात सेल हॉल, अंतर्गत रस्ते, पाण्याची सोय, प्रकाश, पेक पोस्ट, स्वच्छता गृहे, शेतकरी निवास इत्यादी किमान सोई-सुविधा आहेत. बाजार आवारात कोणतीही बँक नाही.

[१३] बाजार समितीचे कार्यक्षेत्र संपूर्ण तालुका असले तरी मुख्य बाजार आवारापासून दूर असणारे ग्रामस्थ शेतकरी वाहतूक साधनांच्या समस्येने अडचणीत आहेत. सामान्यपणे बाजार आवारापर्यंत शेतमाल वाहून नेण्यासाठी ६० टक्के शेतकरी भाड्याच्या वाहनाने वाहतूक करतात. स्वत:च्या मालकीच्या वहातूक साधनांचा उपयोग करणारे बहुतेक शेतकरी स्वत:च्या बैलगाड्या वापरतात. यामुळे शेतमालाची नासाडी, सावकाश वहातूक या अडचणी निर्माण होतात.

[७८.७५ टक्के]

[१४] बहुतेक शेतकरी शेतमाल बाजारात नेण्यापूर्वी त्यांची स्वच्छता ७८.७५ टक्के करतात. ही जाणीव स्वागतार्ह आहे. पंढरपूर बाजार आवारामध्ये प्रतवारीची साधने व प्रशिक्षित कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे एकूण नियमित वस्तूपैकी फक्त पाच वस्तूंचे [शेंग, करडी, तूर, हरभरा, ज्वारी] प्रतवारी नंबर देऊन केली जाते.

[१५] पंढरपूर बाजार आवारात फक्त आठच तोलार [मध्यस्थ] असल्यामुळे वजनमापन होण्यास वेळ लागतो. कधीकधी शेतकऱ्यांना वस्ती करणे भाग पडते. शेतकऱ्यांनी कष्ट करून उत्पादन केलेला शेतमाल योग्य प्रमाणात जातो की नाही याची दखल शेतकरी घेताना दिसत नाही. कारण जवळजवळ ९१.२५ टक्के शेतकरी वजन न करताच शेतमाल बाजारपेठेत नेतात. शेतकऱ्यांनी बाजार समितीचे फायदे सांगताना प्रथमक्रमाने काटेकोर वजनमापन पध्दतीचा अवलंब केला जातो हा लाभ सांगितला.

[१६] ग्रामीण भागातील बहुतेक सर्व शेतकरी शेतमालाची साठवणूक स्वत:च्या घरीच करतात. मात्र अद्याप ३६ टक्के शेतकऱ्यांना शेतमाल साठवणूकीची सवय नाही. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेत व्यापाऱ्यांच्या मालकीची ११ गोदामे [एक हजार मेट्रिक टन क्षमता], वखार महामंडळाच्या मालकीची दोन गोदामे [दोन हजार मेट्रिक टन क्षमता] आणि मार्केटींग

फेडरेशनच्या मालकीचे एक गोदाम [दोन हजार मेट्रिक टन क्षमता] आहेत. बहुतेक शेतकरी व्यापाऱ्यांच्या गोदामाचा वापर करतात. वखार महामंडळ व मार्केटींग फेडरेशनच्या गोदामात शेतकरी शक्यतो शेतमाल ठेवीत नाही. कारण बाजार आवारात आणलेला शेतमाल हा विक्रीसाठीच आणलेला असतो. किंमत वाढण्याच्या अपेक्षेने व किफायतशीर किंमत नसल्याने शेतकरी माल साठवणूक करतात.

[१७] बाजार कार्यपध्दतीवर मध्यस्थ विविध मार्गांनी प्रभाव टाकतात. पंढरपूर बाजारपेठेत जनरल कमिशन एजंट, व्यापारी [१, २, ३ वर्ग] प्रोसेसर, तोलार, वखारवाला, मदतनीस व हमाल या मध्यस्थांची उपस्थिती दिसते. विशेषत: कमिशन एजंट व व्यापारी वर्गांवर व्यवहार हाताळणीची कार्यक्षमता अवलंबून असते. जवळ-जवळ ७६.२५ टक्के शेतकऱ्यांना कमिशन एजंटची आवश्यकता वाटते. कारण तो शेतमालाच्या विना विलंब विक्री बरोबरच कर्ज व उचल देऊन गरज भागवितो असे बऱ्याच शेतकऱ्यांचे मत आहे. असे असले तरी बहुतेक [८७.७५ टक्के] शेतकऱ्यांनी बाजारातील दुराचार प्रकट करताना कमिशन एजंट सारख्या प्रतीच्या शेतमालास वेगवेगळी किंमत देतो. व्यापारी न परवडणारे चार्जेस आकारतो, विविध कपात करतो, हलका माल असा खोटा आरोप करून कमी किंमत देतो असे प्राधान्यक्रमाने दुराचार कथित केले.

[१८] पंढरपूर बाजार समिती दर १०० रुपये शेतमाल विक्रीवर विक्रेत्याकडून २.५० रुपये कमिशन स्वरुपात बाजार फी घेते. ही बाजार फी बाजार समितीच्या नियमानुसार घेतात असे निम्म्यापेक्षा जास्त शेतकऱ्यांनी सांगितले.

[१९] बहुसंख्य शेतकऱ्यांच्यामते बाजारात शेतमाल विक्री रकमेत बाजार समितीच्या नियमानुसार कपात करतात. बत्तीस टक्के शेतकऱ्यांच्या मते बाजार समितीच्या नियमापेक्षा बाजारपेठेत जास्त कपात केली जाते.

[२०] बहुतांश शेतक-यांना बाजारपेठेकडे जाण्यास दलाल, व्यापारी, सावकार इत्यादीमार्फत अडथळे येत नाहीत. जवळ-जवळ ८४ टक्के शेतकरी खाजगी व्यापा-याकडे शेतमाल विक्री न करता पंढरपूर नियंत्रित बाजारपेठेत विक्री करतात. बहुतेक शेतक-यांच्यामते शेतमालाची विक्री त्वरीत होते. पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये शेतमालाची विक्री "खुल्या लिलाव पध्दती" नुसार होते. ही पध्दत शेतकरी व व्यापा-यांच्यादृष्टीने फायदेशीर ठरते. पंढरपूर बाजार आवाराचा दुस-या क्रमांकाचा हाच फायदा सांगितला. शेतमाल लिलाव प्रसंगी पहिल्यांदा होणा-या शेतमाल लिलावास चांगली किंमत प्राप्त होते व नंतरच्या लिलावात त्याची किंमत असमाधानकारक प्राप्त होते असे दिसून आले आहे. याच पध्दतीनुसार शेतमालास प्राप्त होणारी किंमत ५७.५० टक्के शेतक-यांना समाधानकारक वाटते. तर काहींना ती रास्त वाटत नाही असे दिसले. त्याचे कारण पाहता बाजार पेठेत किमान सुविधांचा अभाव, शेतमाल विक्रीसाठी विलंब, विक्री रक्कम मिळण्यास विलंब इत्यादी बाबी शेतक-यांनी कथित केल्या. खाजगी व्यापा-यांकडे विक्री करणा-या शेतक-यांचा शेतमाल आकार कमी असतो.

[२१] बाजारपेठेत उद्भवणारे कलह-वांदा समिती मार्फत त्वरीत मिटविले जातात.

[२२] पंढरपूर कृषि बाजारपेठ दैनिक मुंबई बाजारभाव नोंद करून ठेवते. तसेच पंढरपूर बाजारपेठेतील दैनिक बाजारभाव दैनिक वृत्तपत्रातून प्रसिध्द केले जातात. बहुसंख्य शेतक-यांना बाजार माहिती "इतर शेतक-यांमार्फत", "अनियमित बाजारास भेट" या माध्यमातून मिळते. फारच थोडे शेतकरी त्यांच्या जिव्हाळ्याच्या असलेल्या या प्रश्नाबाबत स्वतः कष्ट घेऊन मूळ स्त्रोत्राकडून विश्वासार्ह माहिती मिळविण्याचा प्रयत्न करतात.

[२३] १९७८-७९ ते १९८७-८८ या दशकाचा विचार करता कृषि उत्पन्न बाजार समितीमध्ये "ज्वारी" हे अन्नधान्य सोडता सर्व नियमित वस्तूंची आवक मंदगतीने वाढत आहे. शेंग, कांदा, गुळ, कापूस यांची आवक १९७८-७९ मध्ये सर्व शेतमालाच्या आवकेच्या १० टक्के पेक्षा जास्त होती. १९८७-८८ मध्ये आवक प्रमाणात खूप घट दिसते. मात्र "ज्वारी" च्या आवक वाढीचा दर प्रतीवर्षी १५.८४ टक्के आहे असे आढळले. यावरुन असे म्हणता येईल की, पंढरपूर बाजार आवार मुख्यत्वे "ज्वारीची" बाजारपेठ बनली आहे. जनावरांच्या बाबतीत शेळ्या-मेंढया व बैलांची आवक जास्त दिसते.

[२४] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीची वित्तीय स्थिती पहाता उत्पन्न मार्गामध्ये बाजार फी व खर्च मार्गामध्ये आस्थापना खर्च या महत्वाच्या बाबी ठळक दिसल्या. दशकामध्ये १९८२-८३ या वर्षाखेरीज इतर सर्व वर्षी बाजार समितीस सरासरीने आधिक्य प्राप्त झाले आहे. कायम निधीची वाढ ११.१५ टक्क्यांनी होत आहे.

[२५] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापन होऊन ४२ वर्षे झाली असूनसुध्दा अनेक फायदे शेतक-यांपर्यंत पोहोचले नाहीत. असे असले तरी पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समिती स्थापनेमुळे शेतक-यास निश्चित ठिकाण, निश्चित वेळ व निश्चित किंमतीची शाश्वती मिळाली आहे.

<u>सु च ना</u> :

या प्रकरणाच्या वरील विभागात मांडलेल्या निष्कर्षांच्या व सर्वेक्षणात समाविष्ट असलेल्या शेतक-यांच्या मतांच्या आधारे पंढरपूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या विकासासाठी पुढील प्रकारे सूचना करता येतील.

[१] बाजार आवारात सर्व सोई-सुविधा उपलब्ध करण्यासाठी बाजार समितीला वित्तीय समस्येला तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे शासनाने

याबाबतीत पुढाकार घेऊन पंढरपूर बाजार आवारात वित्तीय मुदत करावी.

[२] बाजार समितीने वजनमापन करणा-या "तोलारांना" परवाने देऊन त्यांची संख्या वाढवावी व त्याप्रमाणात वजनमापन साधनांची उपलब्धता करावी.

[३] बाजार समिती मार्फत पुरविल्या जाणा-या साठवणूक सोईबाबत शेतक-यांना शिक्षित करावे. बाजार समितीने स्वत:चे गोदाम आवारात बांधावे व शेतक-यांच्या शेतमालावर उचल द्यावी.

[४] शेतक-यांच्या शेतमालास रास्त किंमत मिळण्यासाठी मध्यस्थांची संख्या वाढवावी . त्यातून निर्माण होणा-या स्पर्धेतून शेतमालास जास्त किंमत प्राप्त होईल.

[५] बाजारातील शेतक-यांच्याबाबतीत केल्या जाणा-या दुराचारावर नियंत्रण करावे व कायद्याची अंमलबजावणी तंतोतंत करावी.

[६] बाजारपेठ आकर्षक होण्यासाठी तसेच खाजगी व्यापा-याचे निर्मूलन वा त्याचे प्रमाण कमी करण्यासाठी बाजार समितीने पाऊले उचलावीत.

[७] शेतक-यास शेतमाल विक्रीनंतर रक्कम त्वरीत अदा करावी.

[८] शेतमालांची दैनिक बाजारभाव माहिती आकाशवाणीवरून प्रसिध्द करावी. विश्वसनीय बाजारभाव प्रसार माध्यमांचा वापर करावा. जास्त किंमत देणा-या बाहेरील राज्यातील खरेदीदारांना पंढरपूर बाजारपेठेत आकर्षित करावे.

[९] शेतमालाची आवक वाढण्यासाठी शेतक-याचा उत्पादन खर्च व सर्वसाधारण नफा यांचा विचार करून शासनाने हंगामापूर्वी शेतमालास भाव बांधून द्यावेत.

[१०] हंगाम संपल्यानंतर शेतमालाची आवक वाढते तेंव्हा लिलाव वेळ वाढवावा.

[१२] नियंत्रित बाजारपेठाचे कायदे शेतक-यांपर्यंत पोहचवावेत.

[१३] काही शेतकरी अद्याप व्यापारी, कमिशन एजंट व खाजगी सावकार कडून कर्ज [उचल] घेतात. त्यामुळे शेतक-याचे विक्रीतील स्वातंत्र्य हरण होते. यासाठी खाजगी सावकारावर नियंत्रण बसवावे. शासनाने कमी व्याज दराने शेतक-यास कर्जपुरवठा करण्यासाठी वित्तीय संस्था स्थापन करावी. अथवा शेतकरी, कमिशन एजंट व व्यापा-यांच्या सहभागातून वेगळा निधी उभारुन शेतक-यास वित्त पुरवठा करावा.

[१४] पंढरपूर बाजार समितीने शेतक-याच्या पतीवर शेतक-यांना कृषि आदाने पुरवावित व त्याचे शोधन शेतमाल विक्रीच्या वेळी करावे. शेतक-यांनी सुधारीत पध्दतीने शेती करुन बाजार अधिक्यात वाढ करावी.

[१५] बाजार समितीने वाहतूक व्यवस्था पुरवावी.

[१६] बाजार समितीने शेतक-याकडून प्रत्यक्ष शेतमाल खरेदी करावा व त्याचे भारतीय अन्नधान्य महामंडळ व इतर शासकीय एजन्सीमध्ये वितरण करावे.

[१७] शेतक-यांच्या शेतमालाचे संरक्षण व्हावे याकडे समितीने लक्ष द्यावे.

[१८] शेतकरी निवास सुस्थितीत ठेवावे.

[१९] पंढरपूर बाजार आवारातील हमालाचे वर्तन सुधारण्यासाठी समितीने प्रयत्न करावेत.

[२०] शेतक-यांच्या समक्ष शेतमालाचे वजन व विक्री करावी.

[२१] जनावरांच्या पिण्याच्या पाण्याची अधिक सोय करावी.

[२२] रोकड बट्टा सारख्या कपाती करू नयेत. त्यामुळे शेतक-यांना मिळणा-या फलात कपात होते.

[२३] बाजार आवारात बँकेची सोय करावी.

[२४] भक्कम शेतकरी संघटनेची उभारणी करावी.

यासर्व गोष्टी एकदम होऊन बाजार स्थिती सुधारेल असे मानण्याचे कारण नाही. शेतक-यांच्या गरजा विचारात घेऊन या सूचनांचा प्राधान्य क्रम ठरवून त्या अमलात आणाव्यात अशी अपेक्षा आहे.

*****

" कृषि उत्पन्न बाजार समिती, पंढरपूर अभ्यास"

[ एम. फिल. प्रबंधासाठी प्रश्नावली ]

गावाचे नांव -

[१] १. नांव -

२. वय - ३. जात -

४. शिक्षण - निरक्षर / प्राथमिक / माध्यमिक / उच्च शिक्षण

५. व्यवसाय- शेती / मजूर / हस्तकलाकार / इतर

६. शेतकरी म्हणून अनुभव काळ - ५ पर्यंत/६-१०/१०-२०/२० पेक्षा जास्त [ वर्षे ]

७. कुटुंबातील एकूण व्यक्ती- ८. स्त्री- ९. पुरुष-

[२] वार्षिक उत्पन्न :

| वर्षे | वार्षिक उत्पन्न [रुपये ] |
|---|---|
| १९७७-७८ | |
| १९८१-८२ | |
| १९८४-८५ | |
| १९८५-८६ | |
| १९८६-८७ | |
| १९८७-८८ | |

[३] १. जमिनीचे धारण क्षेत्र :

| क्षेत्र प्रकार | हेक्टर.आर |
|---|---|
| बागायत | |
| कोरडवाहू | |
| पडिक जमीन | |
| गवत पड | |
| एकूण | |

२. कोणत्या प्रकारची पिके घेता ?

अन्नधान्य/नगदी/भाजीपाला/फळे

[४] १. <u>मागील दहा वर्षात जमिनीचे खरेदी व्यवहार</u> :

१] जमिनीचे एकूण क्षेत्र- २] बागायत-

३] कोरडवाहू- ४] जमिनीची एकूण किंमत रु.-

५] पैशाची व्यवस्था काय केली ? -

२. <u>मागील दहा वर्षात जमिनीचे विक्री व्यवहार</u> :

१. जमिनीचे एकूण क्षेत्र २. जमिनीची एकूण किंमत-

३. जमिन विक्रीचे कारण -

[५] <u>पीक पध्दती</u> :

| | घेतलेली पीके | | | |
|---|---|---|---|---|
| | संकरीत | | देशी | |
| | १९७७-७८ | १९८७-८८ | १९७७-७८ | १९८७-८८ |
| खरीप | | | | |
| रब्बी | | | | |
| बारमाही | | | | |

[६] तुमच्या मते बाजार आवार स्थापन्यामागील हेतू काय आहे ?

| | |
|---|---|
| शेतक-यांच्या शेतमालाची व्यवस्थित वितरण करणे | |
| व्यापारी समाजास सहाय्य करण्यासाठी | |
| काहीही नाही | |

[७] तुमच्या गावापासून बाजार आवारापर्यंत शेतमाल वाहतुकीसाठी कोणते साधन वापरता ?

| | बैलगाडी | ट्रक | ट्रॅक्टर |
|---|---|---|---|
| स्वत:ची | | | |
| भाडोत्री | | | |

[८] १. शेतमालाची विक्री, स्वच्छता व प्रतवारी करुन करता का ? होय/नाही

२. बाजारात शेतमाल नेण्यापूर्वी त्याचे वजन करता का ? होय/नाही

[९] १. पिकाचा हंगाम संपल्यानंतर लगेच त्याची साठवणूक करता का ? होय/नाही
असल्यास का ?

| | |
|---|---|
| किफायतशीर किंमत नसल्यामुळे | |
| साठवणूकीची क्षमता असल्यामुळे | |
| किंमती वाढण्याच्या अपेक्षेने | |
| इतर शेतकरी साठवितात म्हणून | |

२. साठवणूक ठिकाण :

| | |
|---|---|
| स्वतः चे घर | |
| स्वतः चे गोडाऊन | |
| भाड्याने गोडाऊन | |
| सहकारी गोडाऊन | |
| जिल्हा विपणन सह. संस्थाचे गोदाम | |

३. तुम्ही शेतमाल बाजार आवारा मध्ये नेल्यानंतर शेतमालाची व्यवस्था कशी करता ?
मार्केट यार्ड मधील गोडाऊन मध्ये ठेवता का ? होय/नाही

| | |
|---|---|
| व्यापाऱ्यांच्या मालकीचे गोदाम | |
| वखार महामंडळाच्या मालकीचे | |
| मार्केट फेडरेशनच्या मालकीचे | |

४. मार्केट यार्ड मधील साठवणूक सोय "पुरेशी" आहे ? होय/नाही

५. या पेक्षा अधिक साठवणूक सोय पुरविण्यासाठी तुम्ही कोणास प्रोत्साहित कराल [एजन्सी नाव] ?

| | |
|---|---|
| केंद्रीय वखार महामंडळ | |
| राज्य वखार महामंडळ | |
| बाजार समिती | |

१०] १. बाजारातील " कमिशन एजंट " ची गरज काय ?

| | |
|---|---|
| शेती प्रक्रीयेसाठी कर्ज व उचल देतो | |
| साठवणूक सोय व शेतमालास संरक्षण देतो | |
| विना विलंब शेतमालाची विक्री करतो | |
| विक्री उत्पन्नाची हमी व बाजार माहिती देतो | |
| मागणी नसलेल्या मालाची विक्री करतो | |
| कमिशन एजंटची गरज नाही | |

२. बाजारातील व्यापाऱ्यांचा दुराचार.

| | |
|---|---|
| अविश्वासार्ह मापे व वजने | |
| सारख्या प्रतीच्या शेतमालाला वेगवेगळी किंमत | |
| धर्मादाय व व्यापारी संघाच्या हितासाठी लहरी रक्कम वजावट | |
| नमुन्यासाठी जास्त प्रमाणात शेतमाल घेतात | |
| न परवडणारे चार्जेस आकारतात | |
| व्यापार प्रक्रीयेवर मर्यादा घालतात | |
| हलक्या प्रतीचा शेतमाल असा खोटा आरोपकरुन लहरी रक्कम वजावट करतात | |
| काहीही प्रश्न नाही | |

३. हा दुराचार दूर करण्यासाठी आपल्या सूचना.

| | |
|---|---|
| संतोतंत कायद्याची अंमलबजावणी | |
| मक्तेदारी मिळण्याजोग्या योजनाची अंमलबजावणी | |
| काहिही मत नाही | |

४. बाजार फी कशी घेतात ?

कायद्याप्रमाणे/जास्त/अनिश्चित

५. बाजारात सततची वजावट करतात काय ?

कायद्यानुसार/कायद्यातील तरतूदीपेक्षा जास्त/काहिही मत नाही

६. बाजारात कमिशन एजंट कडून विक्री होण्यास काय कालावधी लागतो ?

त्वरीत/१ महिन्यात/३ महिन्यात

७. बाजार आवारात जाण्यात तुम्हांला अडथळे येता का ?
दलाल/व्यापारी/नाही

८. व्यापारी वा दलाल तुमच्या गावात येऊन शेतमाल खरेदी करतात का ? होय/नाही

९. सामान्यपणे तुम्ही शेतमालाची विक्री कोणाकडे करता ?
बाजार आवार/खाजगी व्यापारी

[११] १. बाजारपेठे विषयी माहिती देणारे महत्वाचे माध्यम -

| | |
|---|---|
| आधुन-मधुन पण अनियमितपणे बाजारात भेट | |
| इतर शेतक-यांमार्फत | |
| व्यापारी व कमिशन एजंट | |
| रेडिओ | |
| बातमी पत्र | |
| शेती विभाग | |

२. बाजारपेठे विषयीची माहिती न मिळाल्याचा कधी प्रसंग आला का ?
नेहमी/कधीतरी/कधीच नाही

[१२] बाजार आवारात तुम्ही कर्ज कोणाकडून घेता ?
सहकारी संस्था/व्यापारी बँक/खाजगी-सावकार/कमिशन एजंट/उसनवट नाही

[१३] निर्यातदार व इतर एजन्सी मार्फत शेतमालाची प्रत्यक्ष विक्री याबाबत तुम्हांस काय वाटते ?
हवासा वाटतो / हवासा वाटत नाही / कांही सांगता येत नाही

[१४] तुमच्या शेतमालाला मार्केट यार्ड मध्ये रास्त किंमत मिळते का ? होय/नाही

[१५] पंढरपूर मार्केट यार्ड मुळे तुम्हांस काय फायदा झाला ते प्राधान्य क्रमाने सांगा [ १७ ]

[ ] बाजार फी रास्त ठरविली जाते.

[ ] बाजार कारभार नियंत्रित झाला.

[ ] काटेकोर वजन मापन पध्दतीचा अवलंब.

[ ] कायद्याच्या अंमलबजावणीमुळे प्रतवारी वजनमापे व वजावट यामध्ये शेतक-यांस संरक्षण व सहज व्यवहार.

[ ] विश्वसनीय व व्यवस्थित बाजार बातमी उपलब्ध झाली.

[ ] खरेदी विक्रीसाठी योग्य दर्जामापन व मापन पध्दतीचा सोईस्कर अवलंब .

[ ] आवक साठा व किंमतीचा विश्वसनीय आकडयांचा पाठपुरावा करता येतो.

[ ] शेतमाल विक्रीसाठी हॉल, जनावरांच्या पाण्याचा हौद, गाडीतळ, दिवाबत्ती, शेतकरी निवास, साठवणूक इ. सोई-सुविधांचा योग्य पुरवठा.

[ ] बाजार कार्यासाठी परवानगी धारक मध्यस्थ असतात.

[ ] खुल्या लिलाव पध्दतीनुसार विक्री.

[ ] शेती सुधारणासाठी प्रचाराची जास्त सोईस्कर अंमलबजावणी.

[ ] सरकारी खरेदी व किंमत निश्चिती.

[ ] सर्व शेतमालास रास्त, स्थिर किंमत मिळते.

[ ] विक्रेय वाढावा वाढला, उत्पन्न वाढले.

[ ] सुधारित बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा वापर करू लागलो.

[ ] बाजार यंत्रणेवर निरीक्षणाची गरज भागली.

[ ] शेतमालास निश्चित किंमत, निश्चित ठिकाण व निश्चित वेळ मिळाली.

(१६) पंढरपूर बाजार आवाराबाबत तुमच्या काय समस्या, अडचणी आहेत ते प्राधान्य क्रमाने सांगा [१७]

[ ] किमान सुविधांचा अभाव [गैरसोय].

[ ] शेतमालाचा वितरण विलंब.

[ ] अनअधिकृत वार्षिक.

[ ] पाऊस व भटक्या जनावरांपासून संरक्षणाचा अभाव .

[ ] बाजार समिती कार्यालयाचा निराळा दृष्टीकोन.

[ ] कर्जाचा अभाव.

[ ] साठवणूक सोईचा अभाव.

[ ]अविकसित वाहतूक व दळणवळण साधने.

[ ] मध्यस्थाचे अधिक प्रमाणात अस्तित्व.

[ ] किंमती विषयक बाजार माहितीचा अभाव.

[ ] प्रतवारीचा अभाव [भेसळयुक्त मालाची विक्री.]

[ ] वजन व मापामध्ये विविधता.

[ ] बाजार फी चे आधिक्य.

[ ] बाजारातील व्यवहारात फसवणूक.

[ ] धमकीने विक्री.

[ ] विश्राम गृहाचा अभाव.

[ ] शेतकरी संघटनेचा अभाव.

[१७] पंढरपूर कृषि उत्पन्न बाजारपेठेच्या उत्कर्षासाठी तुमच्या शिफारशी, सूचना काय आहेत ?

१.

२.

३.

४.

५.

*****